# बटाटेवडे

साक्षीची कॉलेजला निघायची तयारी चालू होती. आजींनी तिच्या खोलीत डोकावण्याच्या निमित्ताने निथून उगीचच दोन-चार फेऱ्या घातल्या. ब्लू जीन्सवर पांढरा शुभ्र लखनवी कुर्ता घालून, सॅक घेऊन स्वारी तिच्या खोलीबाहेर आली.

"तुझं आयकार्ड आणि पैशाचं पाकीट घेतलंस ना गं आठवणीने?" आजींनी विचारले.

"हो, घेतलं. कधी नव्हे ते एकदाच विसरले होते. पण तू आजी अगदी रोज रोज त्याची आठवण करून देतेस." साक्षी फणकाऱ्याने म्हणाली.

डोळ्यासमोर पेपर धरून आरामखुर्चीत बसलेल्या आजोबांनी पेपराआडून आजींचा पडलेला चेहरा पाहिला.

"ए आजी, आज संध्याकाळी बटाटे वडे करशील? किती दिवसात केले नाहीस, कर ना. बघ, नुसतं नाव काढलं तरी पाणी सुटतं तोंडाला. नक्की कर हं. चल बाय!" असं म्हणत सॅक पाठीशी अडकवून, स्कुटीची किल्ली घेऊन साक्षी गेली सुद्धा.

आजी-नातीचा संवाद ऐकत असलेले आजोबा म्हणाले "हं, करा हं लाड नातीचे. सरळ नाही म्हणावं तिला. मागच्या आठवड्यात तुम्ही पाठ धरली होती. कालपर्यंत डॉक्टरांच्या गोळ्या चालू होत्या. पण नातीने सांगितले करायला म्हणून आज लगेच उभी राहशील गॅसपाशी बटाटेवडे तळत."

आजोबांचा राग शांत करायला आजींनी चहाचा कप त्यांच्यापुढे केला. कांदे-बटाट्याच्या टोपलीत शिल्लक राहिलेल्या दोन बटाट्यांकडे पहात आजी म्हणाल्या, "आता अगदी ठणठणीत आहे मी. जरा तेवढं बाहेरून येताना एक किलो बटाटे आणि एक नारळ घेऊन या. नारळ फोडून आणा बरं का वाण्याकडून आणि लवकर या. लताबाई येईल कामाला. तिच्याकडून नारळ खोवून घ्यायचाय मला. वड्याबरोबर ओल्या नारळाची चटणी तुम्हालाही आवडते."

मनातला राग पिशवीत कोंबून, पिशवी घेऊन

आजोबा बाहेर पडले. बटाटे वाण्याकडे मिळाले, पण नारळासाठी जरा लांबपर्यंत जावं लागलं लागलं. उन्हाची तलखी वाढली होती. वारा गायब झाला होता. झाडापानांच्या हालचाली थबकल्या होत्या. पायरवालच्या नेहमीचा रस्ता सुध्दा लांबल्यासारखा वाटत होता. मुलानं त्यानं बँकेचे काम सांगून ठेवले होते. तेही उद्यावर ढकलावं लागणार होतं.

बटाटे, नारळ घेऊन आजोबा घरी आले. दुपारी दोघांची जेवणं झाल्यावर आजींनी आज वामकुशीला इच्छू दिला. संध्याकाळी सर्वांसाठी बटाटेवडे करायचे म्हणून त्या उत्साहाने कामाला लागल्या. सर्व तयारी करून ठेवली. संध्याकाळी साक्षी आल्यावर मगच गरम गरम तळावेत म्हणजे गरमच खातील. असा विचार करून मनाशीच पुटपुटल्या.

रोज पाच-सव्वापाचपर्यंत कॉलेजमधून घरी येणारी पोर, आज साडेसहा वाजले तरी तिचा पत्ता नव्हता. त्या परत परत घड्याळाकडे बघत होत्या. त्यांचा जीव खाली वर होत होता. प्रतिक्षा ही अशी गोष्ट आहे की ज्यामधून आपल्याला पटकन बाहेर पडायचं असतं. पण अशावेळी नेमका त्यातला प्रत्येक क्षण मोठा करत. गिरनवासारखा अनुभवत असतो आपण.

आजींची घालमेल आजोबांना दिसत होती. स्वयंपाक घरातून बाल्कनीपर्यंत आजींच्या फेऱ्या सुरु होत्या. त्यात आता आजोबाही सामील झाले होते. मनात येणाऱ्या नको त्या विचारांना दूर ठेवण्याचा दोघांचा मूक प्रयास चालू होता.

बेल वाजली म्हणून दार उघडले तर मुलगा, सून एकत्र ऑफिसमधून आले होते. नात अजून आली नाही ह्या काळजीने आजी मटकन दिवाणावर बसल्या.

" साक्षी आली नाही गं अजून कॉलेजमधून"... आजी धडधडत्या काळजाने बोलल्या.

" आज तिला उशीर होणार आहे. एका मैत्रिणीची वाढदिवसाची पार्टी म्हणून पिझ्झा खायला जाणार आहेत. मेसेज

Page No. 83
Date / /

केला होता तिने." सुनेने सांगितले.

"अरे, मग घरी कळवायचे तरी! हिने एवढी बटाटेवड्यांची सर्व तयारी करून ठेवली होती." नकळत आजोबांचा आवाज वरच्या पट्टीत गेला होता.

किचनमधील बटाटेवड्यांसाठी घातलेला घाट पाहून सुनेच्या सुनेच्या कपाळावर पडलेली आठी आजोबांच्या नजरेतून सुटली नव्हती टी.व्ही.युनिटपाशी सकाळी ठेवलेल्या चेककडे लक्ष जाऊन मुलगा म्हणाला, "बाबा तुम्ही बँकेचं काम केलं नाही? अहो, किती अर्जंट होतं ते." आजी दुखावल्या. आपल्याला गृहीत धरलं गेल्याच्या भावनेने आजी-आजोबांना वाईट वाटले.

वय झालंय आता. वृद्ध होऊनही किती वर्षे उलटली. पटापट कामं होत नाहीत आता पहिल्यासारखी. विसरायला होतं. तुमच्या वेगाशी जुळवायचा प्रयत्न करत असतो तरीपण, आजोबांच्या मनातले विचार आजींच्याही डोळ्यात होते.

इतक्यात साक्षी घरात शिरली. आल्या आल्या चिवचिवली, "सॉरी, सॉरी आजी, घरचा फोन लागला नाही. मग मी आजोबा व तुझ्या मोबाईलवर मेसेज केला, तुम्ही वाट पहाल म्हणून."


नात चक्क थापा मारतेय असंच वाटलं आजोबांना पण मग लँडलाइनचा रिसीव्हर नीट ठेवला नसल्याचं लक्षात आलं त्यांना.

नात पुढे म्हणाली, पण मी जास्त खाल्लं नाहीय बरं का. मैत्रिणींना दुखवायचं नाही म्हणून फक्त कंपनी दिली. मला भूक आहे बटाटेवड्यांची. आज मीच सगळ्यांना गरम गरम बटाटेवडे तळून देणार आहे." आजींना हे सर्व ऐकून अगदी भरून आलं

आजोबांना वाटून गेलं आसा कसा हा क्रोध, राग मधूनच डोकं बाहेर काढत असतो. त्याला आवरायला हवं. माफून म्हणून उन्नत होण्याच्या ह्या छोट्या छोट्या संधी असतात. पण त्या आपण तत्पर कृतीशीलतेअभावी गमावतो. निसटलेले असे क्षण परत भेटत नाहीत. दिवस उगवल्यापासून सर्वांनं पार पडणाऱ्या

दिनचर्येत असे किती वर्तमान क्षण आपण पूर्णांशानं अनुभवतो? अशा जिवंत क्षणांची माळ सतत ओघळत असते आपल्या ओंजळीतून. आणि आपल्याला त्याचा पत्ताही नसतो. मनाच्या खिडक्यांची तावदाने उघडल्यावर अलगद टेकतोय आपण वास्तवाच्या जवळ जमिनीवर. आता समज, गैरसमज दूर झाले आहेत.

आजी देवापाशी दिवा लावयला उठल्या. "शुभम् करोती कल्याणम्" ह्या सुरात आता सगळ्यांचे सूर मिसळले आणि निरांजनाच्या मंद प्रकाशात देव्हारा उजळून निघाला"!!!



लीना माटे

Mobile - 9819534428

E-mail - leenashining@gmail.com

